# महाराष्ट्र शासन

## उदयोग विभाग
## जिल्हा उदयोग केंद्र, कोल्हापूर







# 100 दिवसांच्या कृती आराखडयांबाबत 7 कलमी कृती आराखडयावर करण्यात आलेली कार्यवाही.

# विषय क्र.1- संकेतस्थळ


## अ) वापरण्यातील सुलभता :-

- उदयोग संचालनालयाचे www.di.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ असून यावर सर्व माहिती अदयावत केली जाते.



# आ) माहितीचे अदयावतीकरण :-

- उदयोजक व नवगुंतवणूकदारांना विभागाच्या सर्व योजनांची माहिती आणि विविध परवाने मिळविणेसाठी विभागाने Single window system for investor facilitation (MAITRI 2.0) Portal https://maitri.maharashtra.gov.in दि. 4 फेब्रुवारी 2025 रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या शुभ हस्ते कार्यान्वित करण्यात आले आहे.



## इ) माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वंयप्रकटीकरण :-


- उदयोग संचालनालयाच्या वेबसाईटवर सर्व माहितीचे स्वयंसप्रकटीकरण वेळोवेळी करण्यात येते.

## ई) सुरक्षितता :-

- लागू नाही

# ३) लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करुन ऑनलाईन प्रसिध्द करणे :-

- लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत उदयोग संचालनालयामार्फत सेवा ऑनलॉइन करण्यात येतात. सदर ऑनलाईन विहित वेळेत पुरविणेची कार्यवाही या कार्यालयाकडून करण्यात येते.



महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम – २०१५

उद्योग संचालनालय यांनी अधिकृत केलेल्या जिल्हा उद्योग केंद्राच्या सेवांचा तपशील

कार्यालयाचे नांव : जिल्हा उद्योग केंद्, कोल्हापूर

विभाग : पुणे विभाग,पुणे

| अ.क्र. | अधिसूचित सेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली काल मर्यादा | लोकसेवा पुरविण्यासाठी निर्धारित शुल्क | पदनिर्देशित प्रथम अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| ०१ | सामूहिक प्रोत्साहन योजना – २०१९ अंतर्गत मुद्रांक शुल्क माफीचे प्रमाणपत्र | ०७ दिवस | ---- | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग सहसंचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई – ३२ |
| ०२ | सामूहिक प्रोत्साहन योजना २०१३ व २०१९ अंतर्गत पात्रता प्रमाणपत्र अदा करणे | ३० दिवस | ---- | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग सहसंचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई – ३२ |
| ०३ | सामूहिक प्रोत्साहन योजना २०१३ व २०१९ अंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदानाच्या दाव्यांची मंजुरी | १५ दिवस | ---- | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग सहसंचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई – ३२ |
| ०४ | खाजगी माहिती तंत्रज्ञान घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे | ०७ दिवस | ---- | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग सहसंचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई – ३२ |
| ०५ | खाजगी जैव तंत्रज्ञान घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे | ०७ दिवस | ---- | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग सहसंचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई – ३२ |
| ०६ | खाजगी जैव तंत्रज्ञान उद्योगांना इरादा पत्र देणे | १० दिवस | ---- | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग सहसंचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई – ३२ |
| ०७ | खाजगी जैव तंत्रज्ञान उद्योगांना घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे | ०७ दिवस | ---- | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर | उद्योग सह संचालक, पुणे विभाग | अतिरिक्त उद्योग सहसंचालक नवीन प्रशासन भवन, मंत्रालय समोर, मुंबई – ३२ |

● उपरोक्त सेवासाठी कृपया पढील संकेतस्थळाला भेट द्या. www.di.maharashtra.gov.in ● http://maitri.mahaonline.gov.in

# विषय क्र.2 :- सुकर जीवनमान

## नागरीसेवांचे सुलभीकरण :-

- या कार्यालयामार्फत **पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP)** या दोन योजना नागरीकाकरीता राबविण्यात येतात. **सदर दोन्ही योजनांची अंमलबजावणी ऑनलाईन कार्यप्रणालीदवारे केली जाते.** सुलभरितीने योजनांचे लाभ देण्या करीता कार्यालयास्तरावर सीएमईजीपी/पीएमईजीपी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. ज्या दवारे कार्यालयात येणा-या गरजू अभ्यगतांना / सुशिक्षित बेरोजगार युवक/युवती यांना योजनांन बाबत माहिती देण्यात येते.
- **1) सीएमईजीपी** योजना ऑनलाईन कार्यप्रणालीदवारे असल्याने इच्छूक अर्जदाराकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन त्यांचे अर्ज सीएमईजीपी कक्षा मार्फत ऑनलाईन पध्दतीने भरण्यात येवून परिपूर्ण व पात्र अर्जदारांचे अर्ज जिल्हा कार्यबल समितीच्या मान्यतेने संबंधित बँकाकडे मंजूरी करीता पाठविण्यात येतात. सदर योजने मध्ये मार्च-2025 अखेर पर्यंत 100 दिवसाच्या कालावधीत 1214 इतके अर्ज ऑनलाईन पध्दतीने पोर्टलवर प्राप्त् झाले आहेत. त्यापैकी 875 इतके अर्ज छाननी करुन बॅकांकडे पाठविण्यात आले व त्यातील 349 अर्ज बँकांकडून मंजूर झाले आहेत. याचाच भाग म्हणून जिल्हयास देण्यात आलेले सर्वाधिक 1200 लाभार्थी मंजूरीचे उदिदष्ट विहित मुदतीत पूर्ण करण्यात आले आहे. त्याअंतर्गत समाविष्ट असलेली मार्जीन मनी रक्कम रु. 7047.70 लाख ही देखील राज्यामध्ये उच्चांकी रक्कमेची आहे. शिवाय जिल्हयात मंजूर योजने अंतर्गत पात्र लाभार्थींना या वित्तीय वर्षात सर्वाधिक रक्कम रु. **3522.93** लाख मार्जीन मनी वितरीत करण्यात आली आहे.

| अक्र | ऑनलाईन प्राप्त् अर्ज | बँकेस मंजूरी करीता पाठविलेले अर्ज | बँकांन कडून मंजूर अर्ज | सन 2024-25 करीता प्राप्त् उदिष्ट | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | उदिदष्ट | मार्च-2025 अखेरीस साध्य |
| 1 | 1214 | 875 | 349 | 1200 | 1222 |

# 2) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP)
# सन 2024-25

| Sr.No | Target | App. | Fwd | Sanction | | Disb. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Phy. | MM | Phy. | MM |
| 1 | 1150 | 535 | 438 | 223 | 2567.44 | 233 | 2471 |




लोकमत

# उद्योगांचा सूर... नंबर वन कोल्हापूर

## वर्षात १२२२ जणांनी उभारले उद्योग : मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमात कोल्हापूर अव्वल

पोपट पवार
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** एकीकडे नोकरी नाही म्हणत सरकारच्या नावाने ओरडणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असली, तरी सरकारच्याच योजनांचा योग्यरीत्या लाभ घेत कोल्हापूर जिल्ह्यातील १२०० हून अधिक तरुण नवउद्योजकांनी स्वत:चे उद्योग-व्यवसाय उभारत 'राज्यात भारी, आम्ही कोल्हापुरी'चा नारा बुलंद केला आहे. २०२४-२५ या एका वर्षात मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमांतर्गत (सीएमईजीपी) १२२२ जणांनी उद्योग उभारून राज्यात सर्वाधिक उद्योग, सर्वाधिक अनुदान व सर्वाधिक अनुदानाचे वाटप करत तिन्ही विभागात कोल्हापूर जिल्हा नंबर वन ठरला आहे.

मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजनेद्वारे उत्पादन क्षेत्रातील उद्योजकाला ५० लाख रुपये, तर सेवा क्षेत्रातील उद्योजकाला २० लाखांपर्यंत कर्ज दिले जाते. सर्वसाधारण प्रवर्गातील उद्योजकाला कर्ज रकमेच्या १५ ते २५ टक्के, तर विशेष प्रवर्ग, एससी, एसटी, अपंग, माजी सैनिक, ओबीसी व अल्पसंख्यांकांना २५ ते ३५ टक्के अनुदान दिले जाते. जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मान्यता दिल्यानंतर संबंधित प्रकरण बँकेकडे जाते. बँकेने कर्ज प्रकरणाला मंजुरी दिल्यानंतर लाभार्थींच्या खात्यात अनुदान जमा होते. १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या आर्थिक वर्षात जिल्हा उद्योग केंद्राला सीएमईजीपी अंतर्गत १२०० लाभार्थी करण्याचे उद्दिष्ट दिले होते. जिल्हा उद्योग केंद्राने १२२२ जणांना लाभ देत १०१.८ टक्के इतके उद्दिष्ट गाठले आहे. गारमेंटमध्ये सर्वाधिक १४४, अन्न प्रक्रिया २६, ब्युटीमध्ये ३२, फॅशन डिझायनिंगमध्ये ४०, टेक्सटाईलमध्ये ४५, ट्रान्सपोर्टमध्ये ६० असे उद्योग उभारले आहेत.

> **मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमांतर्गत उद्योग-व्यवसाय उभारण्यासाठी अनुदान दिले जाते. २०२४-२५ या एका वर्षात १२२२ जणांनी याचा लाभ घेतला आहे. सीएमईजीपीत जिल्ह्याने उद्दिष्ट पूर्ण केले असून, कोल्हापूर राज्यात अव्वल आहे.**
>
> **- अजयकुमार पाटील**, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर

### ७० कोटींचे अनुदान

औद्योगिक मशिनरी, मसाले, बेदाणे, बेकरी, अन्नप्रक्रिया, पैठणी, पॉवरलूम यासारख्या उद्योगांना अनुदान दिले जाते. जिल्ह्यात २०२४-२५ या एका वर्षात ७० कोटी ४० लाख रुपयांचे अनुदान लाभार्थ्यांना मंजूर झाले. यातील ३२ कोटी २२ लाख रुपयांच्या अनुदानाचे वाटप करण्यात आले. ही संख्या राज्यात सर्वाधिक आहे.

### राष्ट्रीयीकृत बँका भारी

**२३१** सीएमईजीपीत राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखा

**८४६** कर्ज प्रकरणे जिल्ह्यात मंजूर केली आहेत.

**२४२** कर्ज प्रकरणे खासगी बँकांच्या ११७ शाखांमधून मंजूर केली.

### कोणत्या तालुक्यात लाभार्थी

| तालुका | उद्दिष्ट | मंजूर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| करवीर | ३५६ | ३८१ | १०७ |
| शिरोळ | १२० | १४४ | १२० |
| हातकणंगले | २२० | ३२७ | १४८.६ |
| पन्हाळा | ८० | ९७ | १२१.३ |
| गगनबावडा | २० | १२ | ६० |
| भुदरगड | ६० | ३२ | ५३.३३ |
| राधानगरी | ६४ | ८० | १२५ |
| शाहुवाडी | ४० | २९ | ७२.५ |
| कागल | ८० | ५५ | ६८.७५ |
| गडहिंग्लज | ८० | ३१ | ३८.७५ |
| आजरा | ४० | १२ | ३० |
| चंदगड | ४० | २२ | ५५ |

### असे उभारले उद्योग



# विषय क्र.3:- स्वच्छता

## अ) अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण :-

| अक्र | वर्गीकरण | स्वरुप | संख्या |
|---|---|---|---|
| 1 | अ | कायमस्वरुपी | 2585 |
| 2 | ब | 30 - वर्षा पर्यंत | 6813 |
| 3 | क | 05- वर्षा पर्यंत | 550 |
| 4 | ड | 01- वर्षा पर्यंत | 150 |

## आ) मुदतबाहय अभिलेखे नष्ट केल्याचा तपशिल :-

| अ क्र | योजना | स्वरुप | संख्या |
|---|---|---|---|
| 1 | साप्रोयो-1993 | प्रलंबित अर्ज | 504 |
| 2 | साप्रोयो-2001 | प्रलंबित अर्ज | 2422 |
| 4 | साप्रोयो-2007 | प्रलंबित अर्ज | 991 |
| 5 | ईएम पार्ट-1 | प्रलंबित अर्ज | 4115 |
| 6 | ईएम पार्ट-2 | प्रलंबित अर्ज | 1620 |
| 7 | पीएमईजीपी | प्रलंबित अर्ज | 550 |
| 8 | आस्थापना संकीर्ण | प्रलंबित अर्ज | 150 |

# अंतर्गत कार्यालयीन स्वच्छता

**पूर्वी**





**सदयस्थिती**



# अंतर्गत कार्यालयीन स्वच्छता

## पूर्वी




## सदयस्थिती



# बाहय कार्यालयीन स्वच्छता






## इ) जड वस्तू संग्रह नोंदवही अदयावतीकरण :-

- या कार्यालयाकडील जड वस्तू संग्रह नोंदवहीचे अदयावीतीकरण करण्यात आले आहे.

# ई) जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट :-






## ३) जुन्या वाहनांचे निर्लेखन :-

- सदयस्थिती या कार्यालयाकडे जुने वाहन नाही. पूर्वी असलेल्या जुन्या वाहनाचे निर्लेखन सन 2016 मध्ये करण्यात आले आहे.

# विषय क्र.4 :- तक्रार निवारण

**अ)  आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निवारण :-**
**आ) पी जी पोर्टलवरील तक्रारीचे निवारण :-**
**ई)  लोकशाही दिनाचे आयोजन व त्यामधील तक्रारीचे निराकरण :-**

| अक्र | पोर्टल | प्राप्त् अर्ज | निकाली अर्ज | प्रलंबित अर्ज |
|---|---|---|---|---|
| 1 | आपले सरकार | 12 | 12 | 0 |
| 2 | पी जी पोर्टल | 03 | 03 | 0 |
| 3 | लोकशाही दिन तक्रार | 05 | 05 | 0 |

# इ) अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळाबाबत प्रसिध्दी :-



# विषय क्र.5 :- कार्यालयीन सोयी सुविधा

## अ) कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था :-

कार्यालयात येणा-या नागरिकांना कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कार्यालयातील प्रवेशदवाराच्या बाजूस करण्यात आलेली आहे. (Aquagard)



# आ) स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था :-

- कार्यालयामध्ये महिला व पुरुषांसाठी वेगवेगळे प्रसाधनगृहे असून त्याची स्वछता रोजच्या रोज फिनाईल व आवश्यक रसायने वापरुन स्वच्छ केली जातात. त्यामुळे प्रसाधन गृह स्वच्छ अवस्थेत आहेत.



## इ) अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था :-

कार्यालयात येणा-या अभ्यागतांसाठी सुसज्ज व प्रशस्त प्रतिक्षालय आहे.



# ई) कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे :-

- कार्यालयात येणा-या नागरिकांकरीता कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांचे नावाचे नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत.




## जिल्हा उद्योग केंद्र निर्देशिका

| अ.क्र. | तपशिल व कार्यभार | कक्ष क्रमांक |
|---|---|---|
| १. | कार्यालय प्रमुख - महाव्यवस्थापक | १ |
| २. | उद्योग निरीक्षक-विकास योजना/गगन बावडा | २ |
| ३. | व्यवस्थापक - प्रशासन | ३ |
| ४. | व्यवस्थापक -आहरण व संवितरण | ४ |
| ५. | व्यवस्थापक -आस्थापना | ५ |
| ६. | उद्योग निरीक्षक - पन्हाळा, शाहुवाडी | ६ |
| ७. | उद्योग निरीक्षक - राधानगरी, करवीर | ७ |
| ८. | उद्योग निरीक्षक - कागल | ८ |
| ९. | उद्योग निरीक्षक - भुदरगड, शिरोळ | ९ |
| १०. | उद्योग निरीक्षक - हातकणंगले, आजरा | १० |
| ११. | उद्योग निरीक्षक - गडहिंग्लज, चंदगड | ११ |
| १२. | लघु लेखक - स्वीय सहाय्यक | १२ |
| १३. | प्रशासकीय कर्मचारी विभाग | १३ ते १७ |
| १४. | मार्गदर्शन कक्ष | १८ |
| १५. | सभागृह | १९ |
| १६. | खादी व ग्रामोद्योग मंडळ | २० |

## ३) कार्यालयाचे सोंदर्यीकरण : -

- विविध आकर्षक वनस्पतींच्या कुंडया कार्यालयाचे सौंदर्य उठून दिसेल अशा ठिकाणी दर्शनी भागात ठेवण्यात आल्या आहेत.



# विषय क्र.6 :- क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

- **अ) आठवडयातून किमान दोन दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देवून पाहणी करणे :-**

  या कार्यालयाचे तालुकास्तरावर अथवा ग्रामस्तरावर कार्यालय अस्तित्वात नाही.

- **आ) केंद्र व राज्य् शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम/ प्रकल्पांना भेटी देणे :-**

  100 दिवसाच्या मोहिमे अंतर्गत एमएसईसीडीपी व एमएसआयसीडीपी योजने अंतर्गत औदयोगिक समुहांच्या सामाहिक सुविधा केंद्र उभे असलेल्या प्रकल्पांना या कार्यालयाकडील उदयोग निरिक्षक/उदयोग अधिकारी यांचेकडून भेटी देवून पाहणी व मार्गदर्शन करण्यात आले येते.






**इ) क्षेत्रीय भेटी दरम्यान ग्रामपंचायत शाळा,अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य् केंद्र यांना भेटी देवून कामकाजावर देखरेख ठेवणे :-**

- लागू नाही

**ई) ग्रामस्तरावरील कर्मचा-यांचे अनुभव, अडचणी व सूचना यांवर त्वरीत कार्यवाही करणे :-**

लागू नाही

## विषय क्र.7:- ई ऑफिस प्रणाली

**अ) प्रशासकीय कामकाजात 1 जानेवारी 2025 पासून ई-ऑफिस प्रणालीचा वापर करणे :-**

जिल्हा उदयोग केंद्र कार्यालयाकडील सीएमईजीप,पीएमईजीपी व साप्रोयो-2019 या योजना ऑनलाईन कार्यप्रणाली दवारे राबविण्यात येतात.

**आ) ई-ऑफिस प्रणालीत 4 किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेवून प्रकरणांचा निपटारा करणे :-**

सर्व योजनामध्ये 4 किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेवून निपटारा करण्यात येते.

# विषय क्र.8 :- आर्थिक व औदयोगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

## अ) गुंतवणूकदाराकरीता पोषक वातावरण तयार करणे :-

जिल्हयातील नवगुंतवणूकदार यांना प्रोत्साहन देण्या करीता उदयोग उभारणीसाठी केंद्र व राज्य् शासनाच्या जसे पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना व मुख्यमंत्री रोजगार योजना बाबत मेळावे, शिबिरे घेवून जनजागृती केली जाते.100 दिवसाच्या कृतिआराखडयामध्ये जिल्हयात एकूण 26 शिबिरे योजनांच्या प्रसिध्दी करीता घेण्यात आली आहेत.

कोल्हापूर जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद शनिवार दि. 12/04/2025 रोजी स.10.00 वा. **हॉटेल “ दि फर्न ” मुक्त् सैनिक वसाहत, श्री शाहू मार्केट यार्ड समोर, कोल्हापूर येथे** आयोजित करण्यात आली होती. सदर परिषदेमध्ये 151 सांमजस्य् करार करण्यात येवून त्यामध्ये 4160 कोटीची गुंतवणूक आकर्षित आली आहे.






## आ) व्यापारी / कांमगार वर्गाच्या संघटनाशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी सोडविणे :-

जिल्हा उदयोग मित्र बैठकी मध्ये उदयोजकांच्या विविध अडचणी संदर्भात मा.जिल्हाधिकारी अध्यक्षतेखाली जिल्हयातील औदयोगिक संघटना व संबंधित शासकीय विभाग यांची बैठक घेवून उदयोजकांच्या अडचणी सोडविल्या जातात 100 दिवसाच्या कालावधीमध्ये दि. 28/01/2025 रोजी सदरची बैठक आयोजित करण्यात आली होती.



## इ) गुंतवणूकदार उदयोजकांच्या अडचणीचे निराकरण करणे :-

- मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गुंतवणूकदार उदयोजकांच्या अडचणी बाबत दि.01/04/2025 रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत गुंतवणूकदार उदयोजकांच्या अडचणीचे निराकरण करण्यात आले.



## ई) गुंतवणूकदारासाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे :-

- दिनांक 28/01/2025 रोजीच्या जिल्हा उदयोग मित्र बैठकी मध्ये उदयोजकांच्या कायदा व सुव्यवस्था अडचणी संदर्भात मा.जिल्हाधिकारी अध्यक्षतेखाली जिल्हयातील औदयोगिक संघटना व संबंधित शासकीय विभाग यांची बैठक घेवून उदयोजकांच्या अडचणी सोडविण्यात आल्या.



## विषय क्र.9 :- अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

### अ) नव्याने सेवत प्रविष्ठ कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे :-

या कार्यालयाकडे नव्याने रुजू झालेल्या 4 उदयोग निरिक्षकांचा " कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधनी (वने) " पलूस, जि.सांगली येथे दि.01/04/2025 ते 12/04/2025 या कालावधीत पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण झाला आहे.



## (आ) कर्मचा-याच्या पदोन्नत्या व तक्रारीचे निराकरण करणे :-

- कर्मचा-यांना पदोन्न्ती व आश्वासीत प्रगती योजनेचे लाभ देणेचे अधिकार उदयोग सहसंचालक व उदयोगसंचालनालय यांचेकडे आहेत.

- त्या अनुषंगाने दि. 20/03/2025 रोजी विभागीय कार्यालय, पुणे येथे बैठक होवून या कार्योलयाकडील श्री हांडे, सेवानिवृत्त अधीक्षक यांना आश्वासीत योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

## इ) कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे :-

सदरचे प्रशिक्षण सौ.शामली व्ही.चव्हाण, प्राध्यापिका न्यू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, कोल्हापूर यांनी दि.09/04/2025 रोजी दु.3.00 ते 6.00 या वेळेत उदयोग भवन, कोल्हापूर येथे दिले.





## ई) कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) सुरु करणे :-

या कार्यालयातील कर्मचारी ChatGpt या AI टूलचा वापर करतांना....



# विषय क्र.10- नाविन्यपूर्ण उपक्रम
## कार्यालयामध्ये किमान 2 नाविन्य् पूर्ण उपक्रम राबविणे

**1. सीएमईजीपी योजने अंतर्गत रोज दोन प्रकरणे मंजूरी बाबत चर्चा :-**

रोज सकाळी 10.30 ते 11 या वेळेत महाव्यवस्थापक यांचे दालनात सर्व अधिकरी व कर्मचारी यांची बैठक घेवून सीएमईजीपी योजनेअंतर्गत प्रत्येक उदयोग निरिक्षकाने रोज किमान 2 मंजूरी पत्र मिळवण्यासाठी नियोजनकरीता चर्चा करणेत येते. सदर उपक्रमामुळे रोजच्या रोज कामाचे नियोजन होवून प्रभावी अंमलबजावणी होते.



## 2. सिग्मा कक्ष :-

कार्यालयात येणा-या अभ्यगतांना एकाच ठिकाणी (Single Window) सर्व योजनांची माहिती देणे करीता कार्यालयाच्या दर्शनी भागामध्ये सिग्मा कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सर्व योजनांचे Q.R. Code तयार केले त्यादवारे अभ्यगतांना कमी वेळामध्ये सर्व माहीती एकाच ठिकाणी प्राप्त् होते. त्यामुळे कार्यालयातील कामकाजाची कार्यक्षमता वाढली आहे. तसेच येणा-या अभ्यगतांना देखील समाधान प्राप्त होवून त्यांच्या सर्व समस्याचे निराकरण करणे सोयीचे झाले आहे.



# धन्यवाद

